विचारशलाका

संपादक: प्रा. नागोराव कुंभार

वर्ष ३४ वे, ऑक्टोबर २०१९ ते जून २०२०
जोड अंक १३२, १३३ व १३४ वा
ISSN 2229-7901



महात्मा बसवेश्वर विचारविश्व विशेषांक

ISSN 2229-7901

विचारशलाका

संपादक : प्र. नागोराव कुंभार

वर्ष ३४ वे, ऑक्टोबर २०१९ ते जुन २०२०, जोड अंक १३२, १३३ व १३४ वा

वार्षिक वर्गणी : रु. ६००/-, त्रैवार्षिक वर्गणी : रु. १८००/-,
सहावार्षिक वर्गणी : रु. ३६००/-, या अंकाचे मूल्य : रु. ४५०/-

संपादक :

नागोराव कुंभार

संपादन सहाय्य :

डॉ. राजशेखर सोलापुरे, प्रा.डॉ. म.ई. तंगावार
डॉ. विजयकुमार काशीनाथ करजकर

संपादक मंडळ :

सूर्यनारायण रणसुभे	विवेक घोटाळे
अशोक चौसाळकर	रणधीर शिंदे
हरिदास फेरे	प्रकाश कुंभार
भारती पाटील	विवेक सौताडेकर
श्रुती तांबे	ग्यानदेव उपाडे

संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार
'आई', शिवनगर, सूतमिल मार्ग,
लातूर - ४१३ ५१२, दूरध्वनी : (०२३८२) २४८१६७,
भ्रमणध्वनी : ९४२२९४९९६६,
E-mail - kumbharnl@gmail.com
Watsapp. No. - 8805982828

☐ मुद्रक व मुखपृष्ठ डिझाइन : स्नेहा ऑफसेट, लातूर

☐ या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी संपादक, संपादकमंडळ व मुद्रक सहमत असतीलच, असे नाही.

विचारशलाका
संपादक : प्र. नरेंद्र कुंभार
ISSN 2229-7901

वर्ष ३४ वे, ऑक्टोबर २०१९ ते जुन २०२०, जोड अंक १३२, १३३ व १३४ वा

॥ महात्मा बसवेश्वर विचारविश्व विशेषांक ॥

।। अंतरंग ।।

१. म. बसवेश्वर : बंडखोर संत
एच. तिप्पेरुद्रस्वामी / १

२. समग्र युगपुरुष म. बसवण्णा आणि त्यांची वचने
डॉ.एम.एस. कलबुर्गी / १४

३. महात्मा बसवेश्वर : सामाजिक क्रांतीचे अग्रदूत
डॉ. जनार्दन वाघमारे / २१

४. बसवण्णांची पुनर्रचनेची मूल्यछावणी
यशवंत मनोहर / ३८

५. महात्मा बसवण्णांविषयी एक मुलाखत
आ.ह. साळुंखे / ४९

६. महात्मा बसवेश्वरांच्या वचनातील सुभाषितं
प्रा.डॉ. इरेश सदाशिव स्वामी / ५९

७. महात्मा बसवेश्वर
भालचंद्र शिंदे / ६८

८. महात्मा बसवेश्वर व मी
डॉ. अशोक कुकडे / ७८

९. बसवेश्वर यांच्या विचारांची प्रासंगिकता
डॉ. शोभा नाईक / ८१

१०. बसवण्णा आणि वर्तमान
प्रा. राजा शिरगुप्पे / ९४

११. महात्मा बसवेश्वर
डॉ. नलिनी वाघमारे / १०४

१२. क्रांती पथावरील बसव पावले
डॉ. रेवण शाबादे / ११५
१३. विश्व के लिए बसव धर्म (एक देव, एक जगत, एक मानव कुल)
रमजान दर्गा / १२१
१४. बसवअणांच्या तत्त्वज्ञानाची रूपरेखा
प्रा.डॉ. ज.रा. दाभोळे / १४५
१५. महात्मा बसवण्णांचे विद्रोही तत्त्वज्ञान आणि त्याची प्रासंगिकता
डॉ. राजेश्वर दुडूकनाळे / १५५
१६. बसवेश्वरांचा परिपूर्ण लिंगायत धर्म
डॉ.एम.एस. कलबुर्गी / १६२
१७. महात्मा बसवेश्वरांचे प्रत्यक्षवादी विचार आणि कार्य
डॉ. सूर्यकांत घुगरे / १६८
१८. समाजप्रबोधनाचे कृतिशील प्रणेते महात्मा बसवेश्वर
डॉ. सूर्यकांत घुगरे / १७७
१९. महात्मा बसवेश्वरांचे राजकीय विचार
डॉ. राजशेखर सोलापुरे / १९५
२०. महात्मा बसवेश्वर : राज्यशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञ
प्रा.डॉ.आर.डी. साबळे / २११
२१. महात्मा बसवेश्वरांची आर्थिक नीती
प्रा. डॉ. सचितानंद शं. बिचेवार / २१९
२२. बसवप्रणीत शिक्षण पद्धती
राजू ब. जुबरे / २२७
२३. महात्मा बसवेश्वरांचे तात्त्विक विचार
डॉ. वेदप्रकाश ई. डोणगावकर / २३८
२४. महात्मा बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान
डॉ. उद्धव कांबळे / २४४
२५. महात्मा बसवण्णा : स्त्रीमुक्ती चळवळीचे जनक
डॉ. मीनाक्षी जंगम / २५३
२६. बसवण्णा आणि जातिअंताचा लढा
प्रा. राजा शिरगुप्पे / २६३

२३

महात्मा बसवेश्वरांचे तात्त्विक विचार

■

डॉ. वेदप्रकाश ई. डोणगावकर

अंतिम सत्याचा शोध घेणारे शास्त्र म्हणजे तत्त्वज्ञान. तत्त्वज्ञान हा शब्द तत्त्व आणि ज्ञान या दोन शब्दांपासून बनला आहे. तत्त्व हा शब्द 'मूळ' आणि 'आदर्श' या दोन अर्थाने घेता येतो. सत्ताशास्त्रीय दृष्टिकोनातून 'मूळ' तर नैतिक दृष्टिकोनातून 'आदर्श' हे शब्द तत्त्व या शब्दासाठी पूरक ठरतात. म्हणूनच काही वेळा, "विषयाच्या मूळाचे ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान" तर काही वेळा "ज्या शाश्वत, सार्वत्रिक अशा आदर्श प्रारुप विषयाचे ज्ञान प्राप्त करुन जीवन जगायचे असते त्यालाही तत्त्वज्ञान म्हणतात." म.बसवेश्वरांच्या विचारांचा तपशिल लक्षात घेता 'तत्त्व' हा शब्द 'मूळ' आणि 'आदर्श' या दोन्ही संदर्भाने संयुक्तिक ठरतो. अर्थात बसवेश्वरांचे विचार हे प्रामुख्याने सत्ताशास्त्रीय आणि नीतिशास्त्रीय अंगाला स्पर्श करणारे आहेत.

सत्ताशास्त्रीय विचार

सत्ताशास्त्र ही तत्त्वज्ञानाची एक महत्त्वाची शाखा आहे. प्रामुख्याने या शाखेमध्ये या विश्वाच्या बुडाशी असणाऱ्या तत्त्वाचा अभ्यास केला जातो. पाश्चात्य तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटलने विश्वाच्या बुडाशी असलेल्या मूळ तत्त्वाला प्रथम तत्त्व असे म्हटले होते. पाश्चात्य परंपरेत अशा या मूळ तत्त्वाला अनुसरुन पृथ्वी आदी महाभूत, सत्, संभूती, संख्या, कल्पना, ईश्वर, द्रव्य, चिदणू इत्यादीची चर्चा पहावयास मिळते. तर भारतीय परंपरेत अदितत्त्व, परमात्मा, परम् पुरुष, ब्रह्म, ईश्वर, ऋत, अदृष्ट, अपूर्व इत्यादी नाव त्या मूळ तत्त्वासाठी रुढ आहेत. भारतीय आणि पाश्चात्य परंपरेत मूळ तत्त्वाच्या अनुषंगाने 'ईश्वर' हा शब्द अनेकांना मान्य आहे. भारतीय परंपरेत 'ईश्वर' या शब्दाला अनुसरुन निरनिराळ्या देवी-देवतांचे सगुणत्व साकारले जाते. शैव परंपरेत ही याचा प्रत्यय येतो. म.बसवेश्वर हे शैव परंपरेतील संत होते. त्यांनी महादेव, इष्टलिंग,

कूडलसंगमदेव इत्यादी नावाने ईश्वराचा पुस्कार केला आहे. याचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या पुढील वचनातून येतो.

"हे शाश्वत सर्वशक्तिमान विश्वंभरा सृष्टीदाता महादेवा।
नच श्रेष्ठ यापरी दुजा। न शब्द, न देव।
रखवाला तुच या विश्वाचा। स्वर्ग नरक नि साऱ्या विश्वाचा।
अवघा तुच सर्वव्याप्त हे कूडलसंगम नाथा पंथ।।"[१]

या वचनाच्या माध्यमातून बसवेश्वर म्हणतात की, ईश्वर हा सर्व शक्तिमान आहे. तोच या सृष्टिचा दाता आहे. तो सर्वश्रेष्ठ आहे. त्याच्या तुलनेत कोणतेही शब्द वा कोणताही देव श्रेष्ठ नाही. तोच या विश्वाचा रक्षणकर्ता आहे. वास्तविक पाहता बसवेश्वर स्वर्ग-नरक या संकल्पना अमान्य करतात. पण त्याचे अस्तित्व मान्य केले तर अशा या जगताचा ही ईश्वर दाता, रक्षक आहे. अर्थात हा ईश्वर साऱ्या विश्वात व्याप्त आहे.

भारतीय प्राचीन तत्त्वज्ञानात पृथ्वी, जलादी महाभूतांची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली आहे. छंदोकग्यउपनिषदात ३.१८.१-२ या ठिकाणी सांगितल्यानुसार अधिदैवत दृष्टिकोनातून आकाश हे ब्रह्म आहे आणि या आकाशरुपी ब्रह्माचे अग्नी, वायु, आदित्य, दिशा हे चार पाद आहेत. तर बृहदारण्यकोपनिषदात ३.६.३ व ३.६.७ या ठिकाणी 'अग्नि, पृथ्वी व वायु' या महाभूतांचा वसूच्या देवता वा देवतागण म्हणून उल्लेख आहे. चार्वाकांच्या मते 'पृथ्वी-आप-तेज-वायुः इति तत्त्वानी।' म्हणजे पृथ्वी, जल, अग्नी आणि वायु हे 'तत्त्व' आहेत. महर्षी कणादानी, काल, दिक्, आत्मा आणि मनाशिवाय पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पाच महाभूतांचा 'द्रव्य' म्हणून उल्लेख केला आहे. म.बसवेश्वरांच्या वचनातही या पाच महाभूतांचा उल्लेख पहावयास मिळतो. पण बसवेश्वर या पाच महाभूतांना 'देवता', 'तत्त्व' वा 'द्रव्य' म्हणून संबोधित नाहीत. कारण त्यांच्या दृष्टिकोणातून 'ईश्वर' हेच एकमेव देवता, तत्त्व आणि द्रव्य ही आहे आणि अशा या ईश्वरात ही सर्व महाभूते सामावलेली आहेत. अर्थात या पाच महाभूतांचे अधिष्ठाण ईश्वर असल्याचे मत ते प्रतिपादित करतात. या संदर्भात त्याचे पुढील वचन महत्त्वाचे आहे :

"पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश हे सर्व
आदी आधारमूळ परमात्मा लिंगामध्ये

आदी-मध्य-अवसानाला जाणण्यास अगम्य,

सकल वेदशास्त्रांनाही त्याचे वर्णन करणे असाध्य, महांत कूडलसंगमदेव।"[२]

या वचनातून हे दिसून येते की, बसवेश्वर ईश्वराचे सगुणत्व मान्य करतात आणि 'इष्ट-लिंग' हे त्या ईश्वराचे सगुण रुप होय. सांख्य मतानुसार सत्तूतून सत् उत्पन्न होते. अर्थात वस्तूतूनच वस्तू निर्माण होते. याच न्यायाने पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश या भौतिक घटकाच्या उत्पत्तीसाठी बसवेश्वर देखिल 'लिंग' या भौतिक वा सगुण तत्त्वाची संकल्पना मांडत असावेत.

बसवेश्वर ईश्वरवादी आहेत. त्यांचा तो ईश्वर मूळात निराकार आहे. पण ते भक्तिमार्गाचेही पुरस्कर्ते असल्या कारणाने सगुण ईश्वराचेही समर्थन करतात. पण ईश्वराच्या सगुणत्वामुळे भक्तिमार्गाला अनुसरुन ईश्वराचे अनेकत्व सिद्ध होते. परिणामी ईश्वरा-ईश्वरामध्ये श्रेष्ठ कनिष्ठतेचा भेद निर्माण होऊ शकतो. असा हा भेदाभेद टाळण्यासाठी म्हणून बसवेश्वर म्हणतात,

"देव असे एकचि एक, तया नामे अनेक।
परम पतिव्रतेचे सुख, पतिठायी असे देव।
कूडलसंगमदेवा, अनेक दैव पूजुनि होई जीवन निरर्थक"[३]

या वचनातून हे स्पष्टपणे दिसून येते की, बसवेश्वर एकेश्वरवादाचे पुरस्कर्ते आहेत. त्यांच्या दृष्टिकोणातून देव एकच आहे. अशा या एकाच देवाचे अनेक नाम होऊ शकतात. वास्तविक पाहता एका वचनात बसवेश्वर वेदावर टीका करतात. पण एकेश्वरवादाच्या संदर्भाने ते वेदाचा संदर्भ देत म्हणतात,

"एक दोन तीन, देव नसती जाण। गर्वाने फुगऊन बोलू नका।
खरा देव एक, नव्हेचि अनेक। वेद मान्य देख, कूडलसंगा।"[४]

श्रग्वेदात १.१३४.४६ या ठिकाणी म्हटलेच आहे की, 'एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्र्वानमाहुः' म्हणजे परमात्मा एकच आहे. पण ज्ञानीजन त्याचे वेगवेगळ्या प्रकाराने वर्णन करतात. बसवेश्वर वेदाच्या या वाक्याचे समर्थन करताना येथे दिसून येतात. पण वेदातील हे वाक्य केवळ उपदेशात्मक आहे. या तुलनेत बसवेश्वर एकेश्वरवादाचे समर्थन करीत पतिव्रतेला प्राप्त होणाऱ्या सुखाचा दृष्टांत देतात आणि त्याच आधारे ते बहुदेवतावादाला निरर्थक ठरवितात. याच अनुषंगाने बसवेश्वर आणखीन एका ठिकाणी म्हणतात की,

"इष्टलिंग धारण करता देहावरी,
स्थावर लिंगास पुजू नये,
स्वपती सोडून पर पुरुषाची संगत होईल का उचित ?"

या वचनातून बसवेश्वरांचा कट्टर एकेश्वरवाद पहावयास मिळतो. बसवेश्वर 'इष्टलिंगाला' ईश्वराचे सगुण रुप मानतात. त्यांच्या मते, अशा या इष्टलिंगाला एकदा ईश्वर म्हणून धारण केल्यानंतर अन्य लिंगाला वा इतर देव-देवतांना पुजण्यात काहीही अर्थ नाही. कारण असा हा व्यवहार स्पपती सोडून पर पुरुषाची संगती धरल्यासारखी होईल.

ज्ञानमीमांसीय विचार

भारतीय परंपरेत ज्ञानमीमांसीय दृष्टिकोनातून प्रामुख्याने प्रमाणांची चर्चा करण्यात आली आहे. प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, अर्थापत्ती आणि अनुपलब्धी हे प्रमाण आहेत. भारतीय परंपरेच्या तुलणेत पाश्चात्य परंपरेत प्रमाणांऐवजी बुद्धिवाद, अनुभववाद आणि समीक्षावाद या सिद्धांताचा विचार केला जातो. बसवेश्वरांच्या वचनात प्रमाण निहाय विचार झालेला नाही. पण बसवेश्वर ज्ञानाचे महत्त्व प्रतिपादित करतात. ते ज्ञानासाठी 'अनुभव हाच गुरु' वचनाचे महत्त्व मानतात. अर्थात ते वरील सर्व प्रमाणे हे मानवातल्या अखिल अनुभवाचे साधन असल्याचे ते मानत असावेत. ज्ञानाच्या संदर्भात ते म्हणतात, "ज्ञानाच्या बळाने अज्ञानाचा नाश पहा हो !"[६]

भारतीय परंपरेत 'आत्मज्ञान' हा एक महत्त्वाचा विषय आहे. प्रामुख्याने आद्य शंकराचार्य आत्मज्ञानाचा पुरस्कार करतात. त्यांच्या दृष्टिकोणातून आत्मज्ञान हे अनुभूतिचा विषय आहे. अर्थात ते आत्माज्ञानासाठी प्रमाण आदीची आवश्यकता सांगत नाहीत. वर बसवेश्वर ज्या ज्ञानाचा पुरस्कार करतात त्याचा संबंधही प्रमाण आदीशी नाही. तर त्याचा संबंध नैतिकतेशी आहे. अर्थात ज्ञानाचा संबंध आचरणाशी अर्थात कर्माशी आहे. भारतीय परंपरेत मीमांसक कर्माचे पुरस्कर्ते आहेत. ते वेद सम्मत कर्माने मोक्ष प्राप्त होते असे मानतात. त्यांच्या दृष्टिकोनातून सुखानुभूति हेच मोक्ष होय. ते मोक्षाला स्वर्गही म्हणतात. बसवेश्वरही स्वर्ग संकल्पना स्वीकारतात. तेही सुखानानूभूतिला स्वर्ग वा मोक्ष मानतात. पण ते मोक्ष प्राप्तीसाठी वेद सम्मत कर्माला नव्हे, तर सदाचारयुक्त कर्माला महत्त्व देतात. या संदर्भात त्यांचे 'सदाचार हेच स्वर्ग, अनाचार हेच नरक' हे वचन प्रसिद्ध आहे. याशिवाय ते 'कायक व कैलास' म्हणजे 'श्रमानेच मोक्ष मिळते' या

वचनाचे ही समर्थन करतात. अर्थात ते आत्मज्ञान वा वेद सम्मत कर्माच्या तुलनेत सदाचारयुक्त श्रम करण्याला महत्त्व देतात. कारण त्यांच्या दृष्टिकोनातून सदाचारयुक्त श्रमानेच मोक्ष, स्वर्ग वा सुखानुभूति प्राप्त होते आणि याविषयीचे आकलन होणे हेच खऱ्या अर्थाने ज्ञान होय.

बसवेश्वर 'अनुभव हाच गुरु !' या मताचे समर्थक होते. ते शब्दप्रामाण्याचा स्वीकार करीत नसत. त्यांच्या दृष्टिकोणातून शब्दप्रमाण म्हणून प्रसिद्ध असलेले हो वेदादी ग्रंथ व्यक्ती-व्यक्तीत भेद करण्यास कारण ठरतात. परिणामी हे सर्व ग्रंथ प्रमाण म्हणून माणण्यास काहीही कारण नाही. याचाच प्रत्यय आपल्याला पुढील वचनातून येतो :

"वेद म्यानबंद करेन, शास्त्र जेरबंद करेन,
तर्काची पाठ चाबकाने सोलीन,
आगमाचे नाक छाटेन, पहा हो,
महादानी कूडलसंगमदेवा,
मी मादर चन्नयाचा घरचा पुत्र आहे देवा."[७]

नैतिक विचार

भारतीय परंपरेत नैतिक जीवनाला अत्यंत महत्त्व आहे. नीतिशिवाय ज्ञान आणि ज्ञानाशिवाय मुक्ति नाही ! अर्थात भारतीय परंपरेत धर्म आणि नीती यांचा परस्परसंबंध आहे. सामान्यतः आपण पाहतो की, काही लोक भस्म, गंध, माळा परीधान करुन, ध्यानमुद्रेत बसून स्वतः सज्जन, सदाचारी असल्याचे दाखवितात. पण आपल्या त्यांच्या सज्जनपणाच्या मुखवट्यामागे त्यांचे अशुद्ध अंतरंग दडलेले असते. ते छल, कपट, दुष्टकृत्य करण्याच्या बेतात असतात. अर्थात असे हे लोक धर्माच्या नावाखाली सामान्यांची पिळवणूक करणारे असतात. खऱ्या अर्थाने असे हे लोक दांभिक असतात. अशा या दांभिकांना उद्देशून बसवेश्वर म्हणतात, "भस्म लेपून काय उपयोग, अंतरंग शुद्ध नसेल तर ?" अर्थात बसवेश्वर अंतरंग शुद्धीला महत्व देतात. कारण त्यांच्या दृष्टिकोणातून जोपर्यंत अंतरंग शुद्ध होत नाही तोपर्यंत व्यवहार वा आचरण चांगले होत नाही आणि आचरण चांगले नसणे म्हणजेच दुःखाला आमंत्रण देण्यासारखे आहे. बसवेश्वर पुढील वचनातून दुःखालाच नरक मानताना दिसतात :

"देवलोक मृत्युलोक नसे अन्य ठायी,
सत्यवचनी साठले देवलोक, मिथ्या वदणे हाचि मृत्युलोक।
सदाचार स्वर्ग, अनाचार नरक् ! कुडलसंगमदेवा यास तुम्हीच बा साक्ष।"[८]

बसवेश्वर अशा या नरकापासून वाचण्यासाठी नीतिमूल्यानुसार वागण्याचे सूचवितात, ते म्हणतात,

"करु नये चोरी, करु नये हत्या।
मानू नये राग, बोलू नये मिथ्या।
करु नये तिरस्कार, करु नये आत्मस्तुति।
करु नये असूया।
अंतरंग बहिरंग शुद्धि असे यांत,
कूडलसंगमास वश करण्याची हीच रीत।"[९]

भारतीय परंपरेत अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह, ब्रह्मचर्य याशिवाय यम, नियम, अष्टांगमार्ग, साधन चतुष्टि इत्यादी मूल्यांची चर्चा पुर्वी झाली आहे. या परंपरेत बसवेश्वरांचे वरील विचार देखील प्रेरणादायी ठरणारे आहे.

संदर्भ :

१. डॉ. घुगरे सूर्यकांत, वीरशैव व इतर धर्म आणि समाज, बुक स्टॉल गडहिग्लज, कोल्हापूर १९९९, पृ. ०४
२. सौ. शालिनी दौडमनी, महामानव बसवण्णांची समग्र वचने, श्री श्रीशैल सोमानिंग दौडमणी, बेळगाव २००७, पृ. १२६
३. जयदेवी ताई लिंगाडे, बसव वचनामृत मराठी, बसव समिती, बंगळूर १९८९ पृ. ०३
४. राजेंद्र जीरोबे, वचनामृत बसवेश्वरी, श्री मृत्युंजय शरण साहित्य प्रचारक संघ, हिराबाग, मुंबई, १९८३ पृ. २१८
५. वचन, संपा. एम.एम. कलबुर्गी / शंकर पाटील, बसव समिती, बेंगलोर, २०१३ पृ. ०१
६. अरविंद जत्ती, वचनकार आणि व्यक्तिमत्त्व विकास, बसव समिती, बंगळूर, २००६ पृ. १३
७. वचन, संपा. एम.एम. कलबुर्गी / शंकर पाटील, बसव समिती, बेंगलोर, २०१३ पृ. ६२
८. डॉ. दे. जवरेगौडा दे., म. बसवेश्वर - डॉ. आंबेडकर, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी २००७, पृ. ७०
९. जयदेवी ताई लिंगाडे, बसव वचनामृत मराठी, बसव समिती, बंगळूर १९८९ पृ. २२

- डॉ. वेदप्रकाश ई. डोणगावकर
मो. - ९०९६९०८१००

□□□